एस.एम गारमेंट
प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड , न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701
एक वेळ अवश्य भेट द्या 8459953702

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● रविवार २५ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक १० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
दैनिक वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक
मो.न.9422660077

# महाराष्ट्रात येणार जरांगे पाटलांचे वादळ ?

## माजी आमदार, विद्यमान आमदार आणि इतर मातब्बर नेत्यांचे तब्बल ८०० उमेदवारी अर्ज दाखल

### आम्ही ठेका घेतला नाही

मी जातीवाद करत नाही. मी कोणत्या गोरगरीब ओबीसीला, धनगर बांधवांना, मुस्लिम बांधवांना, बारा बलुतेदारांना दुखावलं नाही. फक्त नेत्याला सोडत नाही. आमच्या आणि त्यांच्या सुद्धा नेत्यांना सोडत नाही. शेतकऱ्यांचा मुद्दा का घ्यायचा नाही? कारण मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. आमच्या शेतकऱ्यांचे काय प्रश्न असतात हे आम्हाला माहीत आहेत. ३० सप्टेंबरच्या आत सगळी कर्जमाफी केली पाहिजे. राज्यात अनुदानही मिळाले पाहिजे. पीक विमा सुद्धा मिळाला पाहिजे. एखाद्या मुद्द्यावर ठाम झालो तर मी कोणाच्या बापाला भीत नाही. माझा शेतकरी बाप जगला पाहिजे, आम्ही तुमचा ठेका घेतलेला नाही, अशा शब्दात त्यांनी सत्ताधाऱ्यांना फटकारले.



### त्यांना उलटं टांगून हाणा

तुम्ही लोकांच्या आयुष्यांचे वाटोळे करायला निघाले आहात का? तुम्ही शेतकऱ्यांना एक रुपयाचे कर्ज देऊ नका, आमच्या फक्त दोन-तीन गोष्टी द्या. आमच्या लोकांना कायमचं पाणी उपलब्ध करून द्या, लाईट द्या आणि आमच्या मालाला भाव द्या, तुमचे कर्ज, अनुदान तिकडेच ठेवा. सरकार कारण सुद्धा असं देतं की पीक विम्याचा प्रश्न हा कंपनीचा आहे. परंतु राज्य तुम्ही चालवताना ना? राज्य तुम्ही चालवता. तुमचं कंपन्यावरती नियंत्रण पाहिजे. कंपन्या ऐकत नसतील तर त्यांना उलटे टांगून हाणा. आमचे पैसे घ्यायला गोड लागतात कंपन्यांना आणि देताना त्यांना काय होतं? असा सवाल त्यांनी केला.

मनोज जरांगे पाटील यांनी आता विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय पक्का केलेला दिसत आहे. त्यांनी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवायला सुरुवात केली आहे. अनेकांनी भेटून त्यांच्याशी चर्चाही केली आहे. त्यात माजी आमदार, विद्यमान आमदार आणि इतर मातब्बर नेत्यांचा समावेश आहे. अनेक बड्या पक्षातील लोकही मनोज जरांगे पाटील यांच्याकडून लढण्यास तयार आहेत. मनोज जरांगे यांच्याकडे आतापर्यंत ८०० इच्छुकांनी अर्ज दिले आहेत. या सर्वांना आमदार व्हायचं आहे. मनोज जरांगे पाटील यांनीच हा आकडा आज जाहीर केला आहे. या आकड्यावरून मनोज जरांगे यांची लोकप्रियता किती आहे हे दिसून येत आहे. मनोज जरांगे यांनी मीडियाशी संवाद साधताना ही माहिती दिलीय. आमच्याकडे इच्छुकांचा मोठा डेटा आहे. सुमारे ७०० ते ८०० जणांनी अर्ज केले आहेत. या सर्व अर्जांची छाननी होईल. तज्ज्ञांची समिती हे काम करेल. पश्चिम महाराष्ट्रातून सर्वाधिक अर्ज आले आहेत. तर मराठवाडा, विदर्भातूनही चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पण कोकण आणि मुंबई विभागातून कमी अर्ज आले आहेत. अर्ज येतच आहेत. त्यामुळे इच्छुकांचे अर्ज स्वीकारण्याची तारीख वाढवायची की नाही हे ठरवायचे आहे, असं मनोज जरांगे पाटील यांनी सांगितलं. २९ तारखेला चर्चासत्र येत्या २९ तारखेला आंदोलनाला एक वर्ष पूर्ण होत आहे. माझ्या मायबाप मराठा समाजाने ताकदीने हे आंदोलन लावून धरले होते. त्यामुळेच आंदोलन यशस्वी झालं आहे. या यशाचं श्रेय हे मराठा समाजाच्या एकजुटीला आहे. त्यामुळे येत्या २९ तारखेला अंतरवलीत एक छोटेखानी चर्चा सत्र ठेवू. कारण हे आंदोलन ऐतिहासिक झालेलं आहे. आंदोलनाचा लढा सर्वांनी यशस्वी केला आहे. त्याचे श्रेय सर्व गोरगरीब मराठा समाजाला आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. ही राजकीय बैठक नाही आज मराठा समाजाच्या कानावर काहीही आलं तरी लाखोंच्या संख्येने मराठा समाज अंतरवलीला येतो. माझ्या समाजाच्या चरणी मी नतमस्तक होतो. एका हाकेवर हा समाज येतो. त्यामुळेच मला लढायचं बळ मिळतं. येत्या २९ तारखेला ज्यांना शक्य आहे, त्यांनी अंतरवलीत यावं. फक्त कामे बुडवून येऊ नका. थोड्या संख्येनेच या. मी काही जाहीर आवाहन करत नाही. कारण छोटा कार्यक्रम घेत आहोत. शेतीची कामे खोळंबू नये म्हणून कार्यक्रम छोटाच करणार आहोत. ही कोणतीही राजकीय बैठक नाही, फक्त एक वर्ष पूर्ण झाले म्हणून छोटेखानी चर्चासत्र आपण घेऊ, असंही त्यांनी स्पष्ट केलं. फुकट देत नाही माझा मराठा समाज एकटाच ५०-५५% आहे. तुम्ही आमचे काम करा. तुम्ही सगळे प्रश्न काढून ठेवले आहेत. कामगारांचे प्रश्न, डॉक्टरांचे प्रश्न, वकिलांचे प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न, पोलिसांचे प्रश्न, शहीद कुटुंबाचे सगळे प्रश्न अडकून ठेवलेले आहेत. सत्ता चालवत आहेत आणि गोरगरिबांचे रक्त पीत आहेत. फक्त थोडी चिरीमिरी देतात, आमच्या आयुष्याची सुविधा थोडीच देता. थोडेच देता आणि काढतात खूप. देताना तुम्ही तुमच्या खिशातून देत नाही, आमच्या टॅक्समधून पैसे काढूनच देता, असंही ते म्हणाले.




## संत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त डॉ. योगेश क्षीरसागरांकडून अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

बीड दि.२४ : राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरातील संत भगवान बाबांच्या चौकात प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी श्री.संतभगवान बाबा जयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष अविनाश सानप, अध्यक्ष अनिकेत सानप, माजी नगरसेवक ॲड.महेश गर्जे, डॉ.शिवाजी तिडके, समर्थ तांदळे, मोहन आघाव, विशाल तांदळे, ॲड.राहुल आघाव, संग्राम बांगर, संतोष बडे, निखिल खेडकर यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर पिंपरगव्हाण रोड ,बीड येथे गोकुळाष्टमी उत्साहात साजरी

**बीड (प्रतिनिधी)**

-श्री श्री रविशंकर विद्या मंदिर पिंपरगव्हाण रोड ,बीड येथे आज दिनांक 24 ऑगस्ट 2024 वार शनिवार रोजी गोकुळाष्टमीच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी शाळेचे संस्थेचे सदस्य श्री जैन सर ,संस्थेचे सचिव श्री पारगावकर सर ,शाळेचे मुख्याध्यापक श्री हंसे सर व उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यंची उपस्थिती होती.

भारतातील विविध पारंपारिक सणांपैकी हा श्रावण महिन्यात अष्टमीच्या दिवशी येणारा भगवान श्रीकृष्णाचा जन्मदिवस जन्माष्टमी म्हणून सर्वत्र आनंदाने साजरा केला जातो. त्यानिमित्ताने शाळेत दहीहंडीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मनोरा रचला व दहीहंडी फोडली व सर्वांना गोपाल काल्याचा प्रसाद देण्यात आला. अतिशय उत्साह व भक्ती भावाने परिपूर्ण अशा दहीहंडी उत्सवाचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला. प्राथमिक व पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी राधा व कृष्णाची वेशभूषा धारण करून सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले .इयत्ता पाचवी ची श्रुती उजेगर या विद्यार्थिनीने श्रीकृष्णाची वेशभूषा धारण केली होती तर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी गोविंदाच्या गीतावर अतिशय सुंदर असे नृत्य सादर केले या नृत्याची रचना शाळेचे नृत्य शिक्षक किरण सर यांनी केली होती. विद्यार्थ्यांना गोकुळाष्टमीची, श्रीकृष्णाच्या चरित्राची वर्णन करणारी चित्रफीत दाखविण्यात आली. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते सांस्कृतिक विभागाच्या वतीने या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले व हा कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला.




## संभाजी ब्रिगेड ने आंदोलन इशारा देताच ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा.

शेतकरी बिकट परस्थिती मधे जगत असताना लोकनेते सुंदरराव सोळंके तेलगाव कारखाना यांनी सन २०२२-२३ चे १४९ रू चे प्रती टन बिल अदा केलेले नव्हते, तसेच सण २०२३-२४ चे शेवटच्या हस्यातील शेतकऱ्यांना मागील सहा महिन्यात पासून एक रुपया ही भेटला नव्हता. अनेकांचे कुटुंब संकटात आले, अनेकांच्या घरी लग्न समारंभ असतांना स्वतःचे पैशे असून काही कर्ज काढावे लागले. अनेक शेतकरी परेशान झालेले दिसत असताना संभाजी ब्रिगेड ने आता शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचे पैशे मिळून द्यायचे आता आंदोलन करायचे ठरवले असता दिनांक १२/०८ रोजी निवेदन दिले आणि पुढील दहा दिवसात शेतकऱ्यांना खात्यात ऊस बिल भेटले. तसेच उर उरीत ४९ रू बिल देणार की. नाही देणार हे कारखाना प्रमुखांनी स्पष्ट सांगावे असा इशारा विजय दराडे जिल्हाध्यक्ष विजय दराडे यांनी दिला आहे

# मुख्यमंत्री साहेब लाडक्या बहिनीचे कायद्याने संरक्षण होत नसेल तर बहिणीला शस्त्र बाळगण्याचा परवाना द्या !

## राज्याचे मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे रुग्णसेविका अंजली आहिरे यांची मागणी!



मुख्यमंत्री साहेब लाडकी बहीण म्हणता पण बहिणीचे संरक्षण का नाही करू शकत. कोलकत्ता, कळवा, बदलापूर, पुणे, अशा अनेक ठिकाणी राज्यात मुलीवर अन्याय अत्याचार करून निर्दयी पणे खून करण्यात आले, आरोपी हे मोकाट फिरत आहेत अशी राज्यतील महिला कठोर कार्यवाही करण्यात यावी यासाठी आक्रमक झाल्या पण महाराष्ट्र राज्यातील गृह खाते याकडे लक्ष कधी घालणार कायद्याने संरक्षण होत नसेल तर आम्हाला स्वतःचे रक्षण करण्यासाठी शस्त्र बाळगण्याचा परवानना द्या, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिखित पत्राद्वारे फॅक्स पाठवण्यात आला त्यात माझे नाव

अंजली रंजित अहिरे आहे साहेब श्री स्वामी समर्थ रुग्णसेवा संस्था या मध्ये अध्यक्ष आहे माझे वय वर्षे २३ आहे. मी एका सामान्य घरातील मुलगी आहे. तुम्ही जवळ जवळ महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्हा तालुका शहर राज्यभर लाडकी बहीण योजना पसरवली आहे. प्रत्येक बहिणीच्या खात्यावर ३००० रुपये देखील पाठवले आम्हाला तुम्ही तुमच्या बहीण होण्याची संधी दिलीत. त्या बद्दल तुमचे मनापासून आभार व्यक्त करतो आम्हीं. पण साहेब आमच्या संरक्षण बाबत आपण निर्णय केव्हा घेणार? एका आठवड्यात चार नाबालिकेवर मुलींचा जीव घेण्यात आला. तोही निघृण पणे यावर आपण काय केले साहेब ? अल्पवयीन मुली वर जीवघेणा हल्ला होतो. रस्ता पेट्रोल पंप अश्या खुल्या जागी तिच्यावर अटॅक केला जातो.तिच्या मदतीला कोणीही धावून येत नाहीं. आणि असे पुन्हा घडू नये. हे कसे थांबवावे हा विचार करण्याच्या सोडून समाज विचार करतो मुलींचीच चुकी असेल. तिन्हे लहान कपडे परिधान केलें असतील, म्हणुन असे झाले असेल तिच्या सोबत असा विचार केला जातो

असे का?साहेब माणसाच्या रुपात राक्षस जन्माला आलेला. असून त्याचे दहन होणार ते आम्हा मुलींना सांगा आमचं जीवन भयमुक्त होणार कधी ? त्याला आम्हीं मुलींनी काय करावे. ४ वर्षा च्यामुलीवर लैगिक अत्याचार होतो या चिमुलीला काय पाप केले होते, एका मुलीला नऊ महिने आई पोटात संभाळ करते, तिला फुलाप्रमाणे वीस वर्ष वाढवते, आणि त्याच फुलावर अन्याय अत्याचार करून तिला जीव मारून तिचे तुकडे आई वडिला समोर पहावयास मिळत असेल त्या माता पित्याचे काय हाल होत असतील अशा घटना वारंवार होत राहतील तर असा एक दिवस येईल कि जगात स्त्री नावाचे अस्तित्व सम्पून जाईल, आज आमच्या सोबत होतंय ते उद्या तुमच्या सोबत होत राहील, आम्हाला तुमच्या तीन हजाराची गरज नाही आम्हांला स्वतः च्या संरक्षणनाची गरज आहे, अशा आरोपीना तुमी भरचौकात फासी द्यायला हवी नाहीतर कायद्यात बदल करा मुलीला जन्म देऊ नका असा नियम बनवा मुलींसाठी आई वडील रक्ताचं पाणी करतात त्याच्या जीवाचे का हाल व्हावे, आता तुमच्या लाडक्या बहिणीचे पाय लांडग्याच्या जबड्यात आहे, तरीहात जोडून विनंती आमच्या संरक्षना साठी शस्त्र बाळगण्याची परवानगी द्यावी!

# मोरया साई गोविंदा पथक कुंडेगाव कोळीवाडा तर्फे दहीहंडीची जोरदार तयारी.


**उरण ।प्रतिनिधी**

गोपाळकाला सण जवळ आला असून सोमवार दिनांक २६/८/२०२४ रोजी श्रीकृष्ण जयंती असून मंगळवार दिनांक २७/८/२०२४ रोजी गोपाळकाला सण आहे.या उत्सवाची सर्वत्र जोरदार तयारी सुरू असून विविध गोविंदा पथकाची सुद्धा रात्रंदिवस तयारी सुरू आहे विशेषतः संध्याकाळी तसेच रात्री कामावरून तरुण वर्ग घरी आले की गोपाळकालाची तयारी अर्थातच दहीहंडी फोडण्याची प्रॅक्टिस करतात. एकमेकावर थर रचून मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडण्याचा दररोज सराव केला



जातो. उरण तालुक्यातील नवघर कुंडेगाव कोळीवाडा येथे मोरया साई गोविंदा पथक तर्फे जोरदार तयारी सुरू आहे.सण २०१५ साली मोरया साई गोविंदा पथकाची स्थापना झाली असून या पथकाचे यंदाचे १० वे वर्ष आहे. कुंडेगाव कोळीवाडा गावातील बालगोपाळ व तरुणांचा या पथकात समावेश आहे. जास्तीत जास्त बक्षीसे मिळविण्यासाठी व आपल्या पथकाचे नाव अग्रेसर राहावे यासाठी मोरया साई गोविंदा पथक कार्यरत आहे. या पथकाचे अध्यक्ष गौतम पाटील, उपाध्यक्ष राकेश चोगले, खजिनदार धर्मेंद्र चोगले आहेत. तर प्रशिक्षक प्रशांत बाळकृष्ण कोळी(हनुमान कोळीवाडा ) हे या पथकाला उत्तम असे मार्गदर्शन करत आहेत.शिवसाई राम २८२८, फोस्टर ग्रुप, श्री साई गणेश पदयात्री, ब्रह्मा बॉईज, बाप्पा मोरया ग्रुप, मोरया साई ग्रुप, ग्रामस्थ मंडळ कुंडेगाव कोळीवाडा आदींचे सहकार्य मोरया साई गोविंदा पथकाला लाभत आहे.

## मद्दधुंद समाज कल्याण विभागाच्या अधीक्षकाचा दोन चारचाकी आणि दुचाकीला उडवून पळण्याचा प्रयत्न.



नाशिक । सुरेश इंगळे राज्यभरात गेल्या काही दिवसापासून हिट अँड रन्सच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. त्यातच नाशिकमध्ये हिट अँड रन्स चा धक्कादायक प्रकार उघडकिस आला आहे .एका मध्य धुंद समाज कल्याण विभागाच्या अधीक्षकाने दोन चारचाकी आणि दुचाकीला उडवून पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र यामध्ये सुदैवाने जीवित हानी झाली नाही. या प्रकरणी पोलिसांनी वाहनचालकाला अटक केली असून नाशिकच्या भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक श्रीनिवास देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार २३ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री साडेदहा वाजेच्या दरम्यान समाज कल्याण विभागाचे अधीक्षक विजय चव्हाण (५६) हे त्यांची कार दारूच्या नशेत चालवत होते. पौर्णिमा बस स्टॅन्ड परिसरातील गणपती हॉटेल जवळ उभा असलेल्या गाड्यांवर त्यांनी धडक दिली. या तीन गाड्यांचे नुकसान झाले. त्यामुळे विजय चव्हाण याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहे.

# केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळ - वसंत मुंडे

**परळी वैद्यनाथ ।प्रतिनिधी**

भारत देशातील शेतीवरील बी बियाणे खते कीटकनाशके अवजारे यावर जीएसटीचा कर लावून शेतकरी चार बाजूने आर्थिक संकटात सापडलेला असून शेतकरी हा शेतीमालाला किमान आधारभूत हमीभावाची मागणी करून जनआंदोलन करतो, तर बीजेपी चे मोदी सरकार शासकीय यंत्रणेमार्फत आंदोलन चिरडण्यासाठी अश्रू धुराचे नळकांडी फोडतात, शेतकऱ्यावर लाठीचार्ज, मारझोड करतात, पाण्याच्या पाईप द्वारे पाण्याचा शेतकऱ्यावर तुफान मारा करतात, इंटरनेटची सेवा बंद करून बॅरिकेटस रोडवर लाऊन खड्डे खोदून सिमेंट व लोखंडाचे खिळयाचे ब्लॉक रोडवर आंदोलन चरण्यासाठी लावले जातात . कारण शेतकऱ्यांबरोबर असलेली सायकल मोटरसायकल बैलगाडी ट्रॅक्टर टेम्पो जेसीबी ट्रक इत्यादी वाहनांना दिल्लीकडे जंतर-मंतर मैदानावर जाऊ न देण्यासाठी मोठे षडयंत्र शेतकऱ्यांच्या आंदोलन दडपण्यासाठी भाजपाचे सर्व स्तरावर मोदी सरकार अन्याय अत्याचार शेतकऱ्यावर करीत असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . शेतकऱ्यांचा शेतातील खरीप रब्बीचा माल तयार झाला की परदेशातून मोदी सरकार आयातीला परवानगी देतो त्यामुळे बाजारपेठेतील हमी भावा पेक्षा शेतकऱ्याचा माल



व्यापारी कमी भावाने विकत घेतात. सर्वच शेतीमालावरील निर्यातीचे निर्बंध लादल्यामुळे सोयाबीन भात कापूस बाजरी मका मुग शेंगदाणे तीळ मोहरी कांदा भाजीपाला फळे गहू ज्वारी तुरीचे भाव बाजारात पाडले जातात त्यामुळे शेतकरी चारी बाजूंनी आर्थिक संकटात सापडला आहे. केंद्र सरकारने शेतीमालाला किमान आधारभूत हमीभावाचा आधार द्यावा कारण शेतीवरील खते बी बियाणे कीटकनाशके औषधी मजुरी दैनंदिन उत्पादन खर्च लाईट बिल जीएसटी कर नैसर्गिक संकटे त्यामुळे शेती ही शेतकऱ्याला परवडत नाही या सर्व प्रश्नावर शेतकऱ्याला स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी शेतकऱ्यांसाठी लागू करण्यासाठी भारत देशातील पंजाब हरियाणा उत्तर प्रदेश बिहार राज्यातील लाखो शेतकरी आंदोलनाच्या द्वारे दिल्लीकडे जंतर-मंतरवर जाऊ नये म्हणून केंद्र सरकारने वेगवेगळ्या प्रशासकीय यंत्रणेद्वारे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. सन २०२० ला शेतकऱ्यांनी मोठे आंदोलन केले होते त्यावेळेस ७०० शेतकऱ्यांचा मृत्यू झाला, दररोज आत्महत्या देशात व राज्यात शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या मुळे होत आहेत, शेतकरी आंदोलनामुळे तीन कायदे शेतकऱ्याचे विरोधी होते ते मोदी सरकारला रद्द करावे लागले. केंद्र सरकारने किमान आधारभूत (एम एस पी) किमतीसाठी शेतकरी नेते व विरोधी पक्षाच्या नेत्यांना सोबत घेऊन स्वामीनाथन आयोगाच्या सर्व शिफारशी मंजूर करून ५०/नफा व शेतीमालाला हमीभाव देऊन खते बी बियाणे कीटकनाशके संदर्भात कडक कायदे करून पेरणीच्या वेळेस बोगस बी बियाणे निघाल्यास शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची तरतूद नवीन कायद्यात करण्यात यावी. दुष्काळ,अतिवृष्टीचे, अनुदान व पिक विम्याचे पैसे तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याचे आदेश देण्यात यावेत अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केली.

# दोन अल्पवयीन मुलींवर आश्रमचालकानेच केला अत्याचार ;आरोपी जेरबंद

## २० ऑगस्ट रोजी रात्री आश्रमचालक दादासाहेब पुंडलिक अकोलकर याने दोन अल्पवयीन मुलींना आपल्या खोलीत बोलावून लज्जा वाटेल असेल कृत्य करत लैंगिक अत्याचार केले.

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

कन्नड हतनूर येथील आध्यात्मिक शिक्षणासाठी आश्रमात राहाणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवर आश्रमचालकानेच अत्याचार केल्याची घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये घडलीय. दादासाहेब अकोलकर (वय ६७) या आरोपीविरुद्ध कन्नड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कन्नड तालुक्यातील हतनूर शिवारात गेल्या दहा वर्षांपासून आध्यात्मिक शिक्षण, वादन, गायनाचे प्रशिक्षण देण्यासाठी आश्रम चालवण्यात येतो. या आश्रमातील मुली जवळच असलेल्या एका शाळेत शिक्षण घेतात आणि शाळा



सुटल्यानंतर आश्रमात परत येतात.

२० ऑगस्ट रोजी रात्री आश्रमचालक दादासाहेब पुंडलिक अकोलकर याने दोन अल्पवयीन मुलींना आपल्या खोलीत बोलावून लज्जा वाटेल असेल कृत्य करत लैंगिक अत्याचार केले. शिवाय, या घटनेची वाच्यता केल्यास आश्रमातून हाकलून देण्याची धमकी दिली. पीडित मुलींकडे मोबाईल नसल्याने आणि आश्रमचालकाची दहशत असल्याने दोन दिवस त्यांनी याबाबत कुठेही वाच्यता केली नाही. पीडिताच्या पालकांनी आज आश्रमात येऊन आश्रमचालक दादा महाराज अकोलकर यास जाब विचारला मात्र त्याने उडवाउडवीची उतरे दिली. याप्रकरणी पीडित मुलींच्या फिर्यादीवरून दादासाहेब पुंडलिक अकोलकर ऊर्फ दादा महाराज याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पीडितांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, आरोपीस अटक करण्यात आली आहे.

# संत भगवान बाबा यांनी शिक्षणावर भर दिला - अँड.मनोज संकाये

## मित्र मंडळाच्या वतीने भगवान बाबा जयंती उत्साहात साजरी!

परळी वैजनाथ । प्रतिनिधी राष्ट्रीय संत आणि ऐश्वर्य संपन्न संत म्हणून ओळख असलेले संत



भगवान बाबा यांची जयंती सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने भगवान बाबा चौकात साजरी करण्यात आली. आयुष्यामध्ये त्यांनी गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी अथक परिश्रम घेतले आणि शिक्षणाचे महत्त्व सर्व समाजाला समजावून सांगण्याचे कार्य त्यांनी केले असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

परळी येथील भगवान बाबा चौकामधील त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीकांत चाटे,राहुल कांदे, शिवा बडे,काशिनाथ सरवदे,मुंजाभाऊ साठे,रणजित सुगरे,सतीश मुंडे,रवी मुंडे,अंगद कांदे,सचिन मुंडे,प्रवीण रोडे,सुंदर आव्हाड,संतोष कांबळे, बाळासाहेब चाटे, स्वप्निल आदी उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र भालचंद्र देवस्थान ट्रस्ट लिंबागणेश यांच्या सौजन्याने संकष्टी चतुर्थी निमित्त नेत्र तपासणी शिबिर संपन्न

लिंबागणेश:- ( दि.२४) बीड तालुक्यातील संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध असलेले बालाघाटा वरील लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दि.२२ गुरुवार रोजी संकष्टी चतुर्थीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर भाविक दर्शनासाठी येतात.त्याचेच औचित्य साधून आनंद्ऋषिजी नेत्रालय अहमदनगर यांच्या माध्यमातून आधुनिक कॉम्प्युटर द्वारे नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर भालचंद्र गणपती मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले आहे. नेत्रतज्ञ डॉ.दिपक घाडगे यांनी आधुनिक कॉम्प्युटर द्वारे रूग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले. संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने आलेल्या भाविकांनी मोठ्या प्रमाणावर शिबिराचा जवळपास १५० भाविकांनी लाभ घेतला. यावेळी श्रीक्षेत्र भालचंद्र देवस्थान ट्रस्टचे व्यावस्थापक




चिंतामण जोशी , विश्वस्त पुजारी श्रीकांत जोशी, माजी सैनिक सुंदरभाऊ वाणी,मंगेश जोशी,वरद जोशी यांनी डॉ.दिपक घाडगे यांचा सत्कार केला.यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, पत्रकार हरीओम क्षीरसागर , संजय घोलप, विनायक वाणी,बाळकृष्ण आवसरे,जम्मन कांबळे आदी उपस्थित होते.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

# मुलिंची खेडछाड करणाऱ्या टारगटांचा बंदोबस्त करण्याची भेंडा ग्रामस्थांची मागणी

**संतोष औताडे- अहमदनगर प्रतिनिधी**

सविस्तर माहिती -नेवासा तालुक्यातील भेंडा येथील शाळा, विद्यालय व महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलिंची खेडछाड करणाऱ्या टारगटांचा बंदोबस्त करण्याची भेंडा ग्रामस्थांची मागणी केली आहे. नेवासाचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांना दिलेल्या निवेदनात ग्रामस्थांनी म्हंटले आहे की,भेंडा येथील महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात शिक्षणासाठी परीसरातुन मुली येत असतात. सदरील महाविद्यालय व शाळे जवळ अनेक वेळा मुलींच्या छेडछाडीचे प्रकार पडले आहेत. दररोज कुणाच्या ना कुणाच्या मुलींसोबत छेडछाड होत असते. परंतु मुलीच्या इज्जतीचा व इभ्रतीचा प्रश्न असल्याने कोणी काहीही बोलत नाहीत, चर्चाकरीत नाही. पालक किंवा कोणीही त्यावर भीतीपोटी चर्चा करायला तयार नाहीत. शाळा व महाविद्यालयाच्या परीसरात मोठ्या प्रमाणात टुकार मुलांचे टोळके सकाळ पासून ते शाळा, महाविद्यालयाला सुट्टी होई पर्यंत हे टोळके उभे राहून मुलिंची छेडछाड करत असतात, मुलींचा पाठलाग करतात, जोरात हॉर्न वाजवून, गाडीला जास्त रेस करून, वेगवेगळे प्रकारचे कर्णकर्कश भावाजाचे हॉर्न वाजवून गाडया पळवत असतात. या टोळक्याना जाब विचारल्यास ते पालकांच्या घरी जावून दमदाटी करण्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. तसेच शाळा,कॉलेजच्या शिक्षकांनाही दमदाटी करून त्यांनी मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण केली आहे. त्यामुळे शिक्षकही भीती पोटी काहीही बोलत नाहीत. या टोळक्याना राजकिय अभय असल्याने त्याना कशाचीच भीती राहीलेली नाही. दररोज कुठल्या ना कुठल्या मुलीवर अन्याय होत आहे. यापूर्वी आपल्या खात्याकडे तोंडी तक्रारी केल्या होत्या मात्र त्या तक्रारीची तातपुर्ती दखल घेतली जाते व पुन्हा मागे जसे आहे तसेच चालते. दोन चार दिवस पोलीस शाळा महाविद्यालयात फिरतात व नंतर परत तसेच चालू राहते. या टोळक्यातील काही मुलांचे पालक हे गुन्हेगारी क्षेत्रातील असल्याने तसेच त्यांना विविध राजकिय पक्षांचे आश्रय असल्याने इतर पालक त्यांच्या विरोधात जात नाहीत. तसेच त्यांच्या पालकांना जबाब विचारल्यास ते पालकच टोळक्याने येवून हाणामारी करून दहशत निर्माण करतात. त्यांचा एकच उददेश असतो तो म्हणजे गावात जरब निर्माण करणे व दहशतीच्या सावटाखाली ठेवणे. काही पालकांची गुन्हेगारीची पार्श्वभूमी असल्याने स्थानीक पोलीस स्टेशनला त्यांची ओळख असल्याने त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. त्यामुळे आम्हाला नाईलाजाने आपल्याकडे दाद मागण्याची वेळ आलेली आहे. देशामध्ये मुलींवर अत्याचारांचे प्रमाण वाढले आहे, आमच्याही परीसरात अशा प्रकारच्या घटना पडू नये अशी अपेक्षा आम्ही व्यक्त करतो. तरी आपण तातडीने सदरील प्रकरणात लक्ष घालून आमचे भागातील विद्यार्थीनीना अभय द्यावे व या टुकार टोळक्यांचा बंदोबस्त करून कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना ही या निवेदनाची प्रत पाठविली आहे. निवेदनावर नानासाहेब तागड,नामदेव निकम,बाळकृष्ण पुरोहित,दीपक कुटे, बबन गोरे,हीरालाल धनवडे,बाळासाहेब नवले,सोमनाथ काळे,तेजस भागवत,मिनिनाथ आरगडे,अस्लम शेख यांच्या सहया आहेत.

# डॉ. महेश गोलेकर व मा.विजयसिंह गोलेकर यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप.



खर्डा ( प्रतिनिधी ) येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे सचिव, डॉ.महेश गोलेकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस, जामखेड.तालुकाअध्यक्ष. विजयसिंह गोलेकर यांच्या वाढदिवसानिमित्त खर्डा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेल्या महिला तसेच बालकांना फळे वाटप करण्यात आली. याप्रसंगी खर्डा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अजित देशमुख प्रा. चंद्रकिशोर बारटक्के, प्रा. शिवानंद जाधव, प्रा. ओंकार खिस्ते, प्रा. श्रीकांत तनपुरे, प्रा. सतीश शिंदे, प्रा. नकुल खवले, प्रा. भारत मेंगडे, श्री.ऋषिकेश गणगे, श्री.राजू धनलगडे आदी याप्रसंगी उपस्थित होते.

# दिवा शिवसेना आयोजित आधारकार्ड शिबीर.

**आयोजक मा. नगरसेवक शैलेश पाटील.**

- प्रतिनिधी ठाणे, दिवा ता २४ : दिवा शिवसेना उपशहर प्रमुख तथा मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वाढदिवसा निमित्ताने सद्गुरुवाडी येथील जनसंपर्क कार्यालयात दोन दिवसीय आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आधारकार्ड अद्ययावत करणे, नवीन आधार कार्ड काढणे, जन्मतारीख, मोबाईल नंबर लिंक करणे, आधारकार्डचे अपडेट्ट करण्यासाठी मा. शैलेश पाटील यांच्या कार्यालयाच्या वतीने सदर शिबीर दि २४ व २५ ऑगस्ट रोजी होणार असून दिव्यातील गरजवंत लोकांना आवाहन करण्यात आले आहे. सदर आधारकार्ड शिबिरास पहिल्याच दिवशी अनेक विद्यार्थी, वयोवृद्ध तसेच महिला व पुरुषांनी सहभाग नोंदवला. अनेकांच्या आधारकार्डात त्रुटी असलेल्यानी श्री पाटील यांच्या कार्यालयात जाऊन शिबिराचा फायदा घेतला प्रसंगी प्रचंड गर्दी झाल्याने सदर शिबीर आणखी ऐक दिवस सुरु ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सदर शिबिराचे उद्धाटन शैलेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिव्यातील शेकडो नागरिक व महिलांनी आधार कार्ड मधील त्रुटी दुरुस्त करून घेत आपला सहभाग नोंदवला.



# बदलापूर येथे बाल विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमास तात्काळ फाशी द्या महाविकास आघाडीची निवेदनाद्वारे मागणी

परळी (वार्ताहर) बदलापूर जिल्हा ठाणे येथे 4 वर्ष व 6 वर्ष वयाच्या बाल विद्यार्थिनींवर शाळेतील सफाई कर्मचाऱ्यानी लैंगिक अत्याचार केलेला उघड झाला असून हे प्रकरण दडपण्यासाठी शाळेतील संस्थेने व फिर्यादी देण्यासाठी जाणून-बुजून चाल डखल केलेली असून संबंधित प्रत्येक घटकावर कडक कारवाई करावी व अत्याचार करणाऱ्या नाराधामला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी महाविकस आघाडीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्रात महिलावर व विद्यार्थिनीवर होत असलेले लैंगिक अत्याचार थांबवण्यासाठी आरोपींना तात्काळ कडक शासन करण्याच्या दृष्टीने कारवाई करावी महाराष्ट्रात महिलांच्या सुरक्षेबाबत असुरक्षित आहे बऱ्याच ठिकाणी महिलांवर लैंगिक अत्याचार झाल्याचे प्रकरण उघडकीस येत आहेत ज्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राला कलंक लागत असून महाराष्ट्राची प्रतिमा मलिन होत आहे. बदलापूर येथे बाल विद्यार्थीनींवर झालेल्या अत्याचाराचा महाविकास आघाडी परळीच्या वतीने जाहीर निषेध करून आरोपींना तात्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली



आहे या प्रसंगी निवेदन देताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सौ सुदामतीताई गुट्टे, तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, शहराध्यक्ष ॲड जीवनराव देशमुख, विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार, कम्युनिस्ट पक्षाचे नेते पांडुरंग राठोड, ॲड परमेश्वर गीते, कामगार सेल जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, तालुका उपाध्यक्ष महारुद्र कदम, तालुका संघटक दत्ता शिंदे राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष सय्यद फिरोज , युवक तालुका उपाध्यक्ष वृक्षराज काळे, तालुका संघटक बब्रुवान आघाव, तसेच पंडितराव रोडे,मुजन्मल भाई,शेख जावेद,करण कांबळे, अन्वर भाई, शेख मुक्ताब यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



# ग्रामीण भागात सर्वोत्कृष्ट गुणवत्ता आहे-प्रा.ईश्वर मुंडे ॲड.सारंग रामराव मुंडे मुंबई विद्यापीठात सर्व प्रथम

किल्ले धारूर । प्रतिनिधी ग्रामीण भागातील विद्यार्थी जिद्दी,मेहनती आसतात त्यांच्या मध्ये सर्वोत्कृष्ट गुणवत्ता आसते फक्त त्यांना संधी मिळण्याची गरज आहे. संधी मिळवल्यावर ग्रामीण विद्यार्थी आपली गुणवत्ता सिध्द करतात असे मत राष्ट्रवादी कॅांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर मुंडे यांनी व्यक्त केले. प्रा.ईश्वर मुंडे यांच्या अंबाजेगाई येथील आनंद भवन निवासस्थानी ॲड.सारंग रामराव मुंडे यांच्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते.धारूर तालुक्यांतील भोगलवाडी चे रहीवासी अंबाजोगाई तालुक्यांत जिल्हा परिषद केंद्रीय शाळा भावठाणा येथील केंद्रीय मुख्याध्यापक व केंद्र प्रमुख असलेले रामराव नारायणराव मुंडे यांचे द्वितीय चिरंजीव ॲड. सारंग मुंडे यांनी नुकतीच एल.एल.एम.ही कायद्याची पदवीत्तर पदवी मुंबई विद्यापीठातून सर्व प्रथम क्रमांकाने प्राप्त केली आहे. या मुळे प्रा.ईश्वर मुंडे यांनी ॲड.सारंग मुंडे यांचा सत्कार केला. या वेळी अंबाजोगाई येथील विधीज्ञ ॲड.माणिकराव आदमाने, वडवणी येथील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते श्रीराम मुंडे,इम्रान शेख उपस्थीत होते.

# वर्ल्ड रेकॉर्डच्या माध्यमातून पालीमकरांनी बीड जिल्ह्याची वेगळी ओळख निर्माण केली - डॉ.ॲड अशोक तांगडे

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे तांदुळावर चित्र रेखाटून स्नेहा पालीमकर यांची वेब वर्ल्ड रेकॉर्डमध्ये

**बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी**

येथील प्रसिद्ध व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांनी बीड जिल्ह्याचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड लिमका बुक ऑफ रेकॉर्ड इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड वेब वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदवले. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून त्यांची कन्या स्नेहा सुहास पालीमकर यांनी जगातील सर्वात छोटे छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र १.४ सेमी तांदुळावर रेखाटून वेब वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नाव नोंदवले निमित्ताने तिच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

त्यावेळी अध्यक्षीय भाषणात बीड जिल्हा बालकल्याण समितीचे अध्यक्ष अँड अशोकजी तांगडे साहेब म्हणाले की पालीमकर यांनी बीड जिल्ह्याची वर्ल्ड रेकॉर्ड आर्टचा जिल्हा म्हणून एक वेगळीच ओळख निर्माण केली. संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या छत्रपती शिवरायांचे तांदुळावर चित्र काढणे हे जिकरीचे कार्य स्नेहा पालीमकर यांनी पूर्ण केले. श्री शिवजयंती निमित्त काढलेल्या या चित्राची नोंद आंतरराष्ट्रीय पातळीवर होणे हे जिल्हा वासियांसाठी अभिमानास्पद आहे. या कार्यक्रमास ह .भ .प महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी शुभेच्छा दिल्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून नामांकित वकील अँड. अनिलजी बारगजे, मा आ. सुनील धांडे(दादा), मा. मेघशाम पिंगळे (रोटरी क्लब बीड), न.प.मा सभापती विनोद मुळक, शितल कुमार बल्लाळ साहेब (पी आय), तत्त्वशील भाऊ कांबळे, ह. भ. प शिवाजी महाराज मिसाळ हे उपस्थित होते. कार्यक्रमावेळी अँड अनिल बारगजे म्हणाले की, आध्यात्मिक शैक्षणिक वारसा लाभणे यासाठी संतांचे आशीर्वाद पाठीशी असावे लागतात आणि पालीमकर कुटुंबीयांच्या पाठीशी संत कृपा असल्यामुळे ही प्रगती साध्य होत आहे. या कार्यक्रमास इंजि. पालवनकर साहेब, आयुर्मंगलम



निवासी मूक बधिर विद्यालयाचा स्टाफ, समाजसेवक प्रवीण पालीमकर, विकास पालीमकर, अशोक ढोले, प्रकाश तावरे, राहुल मुळूक, भास्कर पिंपरीकर, डॉ. वैभव राडकर, संभाजी विद्यालय बीड येथील सौ. वीर मॅडम, अमोल राऊतमारे, मारुतीराव चव्हाण, निलेश सर्वज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन ह. भ. प भास्कर महाराज जोशी यांनी केले होते. आभार प्रदर्शन डॉ. ओंकार पालीमकर यांनी केले.

# ज्ञानराधाच्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या व्यथा, दोषींना शिक्षा मिळावीच पण निर्दोष असणारांचे काय ?




केज । सचिन भालेराव बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टिस्टेट कॉ. ऑप. क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष सुरेश कुटे, अर्चना सुरेश कुटे, संचालक मंडळ यांच्यासह कर्मचाऱ्यांवर विविध ठिकाणी गैरव्यवहार प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. कुटे हे न्यायालयीन कोठडीत आहेत. सदरील गैरव्यवहारात ठेवीदारांच्या तक्रारीनुसार संचालक मंडळाबरोबरच कर्मचाऱ्यांवर ही गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. यात कर्मचारी दोषी आहेत काय ? गैरव्यवहारात दोषी असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल व्हायलाच हवेत मात्र ज्या कर्मचाऱ्यांचा काहीच दोष नाही त्यांचे काय याबाबत त्यांनी न्याय कुणाकडे मागायचा हाच प्रश्न आहे बेरोजगारीच्या कचाट्यातून सुटण्यासाठी तरुणांनी मल्टीस्टेट मध्ये नोकरीचे काम स्वीकारले. त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू झाला यातून कुटुंब उभे राहिली. काही काळ नोकरी केल्यानंतर ठेवीदारांच्या ठेवीबाबत परत मिळत नसल्याचे गैरव्यवहाराचे प्रकरण पुढे आले आणि अक्षरक्ष या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाची वाताहात झाली आहे. विविध ठिकाणी कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. सदरील गुन्ह्यात पोलीस कर्मचाऱ्यांना अटक करत आहेत. तपासही सुरू आहे. ज्यांनी मल्टीस्टेटच्या अधिकृत नियमावलीप्रमाणे काम केले कशातही गैरव्यवहार केला नाही अशा कर्मचाऱ्यांचा यामध्ये नेमका दोष काय? गेल्या दहा महिन्यापासून कर्मचाऱ्यांना पगार मिळत नाही.

कर्मचाऱ्यांवर अवलंबून असणारे कुटुंब यांची आज उपासमार होत आहे वृद्ध आहे वडिलांना औषध उपचार करणे ही कठीण झाले आहे. विविध ठिकाणी दाखल होणारे गुन्हे या प्रकरणात कर्मचारी भयभीत होऊन सैरभर फिरत आहेत कुटुंब विस्कळीत झाले आहे. घोटाळा प्रकरणातील भीतीमुळे कर्मचारी मानसिक दृष्ट्या अशक्त झाले आहेत. मुलांच्या शिक्षणाच्या फीस, कुटुंबाचा खर्च, औषध उपचारासाठी लागणारे पैसे अशा विविध विवंचनेत तत्कालीन कर्मचाऱ्यांची कुटुंब राहत आहेत दोशींना अभय देऊनच नये मात्र केवळ नोकरी स्वीकारली म्हणून त्या कर्मचाऱ्यांचे आयुष्य उध्वस्त होणार आहे का असाच सवाल दुसऱ्या बाजूने उभा झाला आहे. एकूण नोकरीच्या कालावधीमध्ये अनेक कर्मचाऱ्यांच्या व्यवहारात एकही एमपीची अप्रतफत झालेली नाही ज्या पद्धतीने वरिष्ठ सूचना देतील त्या पद्धतीने व्यवहार झाले असल्याचे कर्मचाऱ्यांनी खाजगीत सांगितले

## समाज आरोपीच्या नजरेतून पाहतो

मल्टीस्टेट मधील कर्मचारी भयभीत होऊन जीवन जगत आहेत अशा परिस्थितीमध्ये सर्व समाज नातेवाईक हे त्यांच्याकडे आरोपीच्या नजरेतून पाहत आहेत यामुळे अजूनच कर्मचाऱ्यांची मानसिक स्वास्थ्य बिघडत चालले आहे. मल्टीस्टेट मध्ये ठेवलेले ठेवीदारांचे पैसे मिळायलाच हवेत. पोटाला पीळ देऊन अनेक सामान्य परिस्थिती नागरिकांनी ठेवी ठेवल्या होत्या त्यांना त्या तात्काळ मिळायलाच हव्यात मात्र या घोटाळा प्रकरणांमध्ये निर्दोष असणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याची शिक्षा मिळू नये अशीच माफक अपेक्षा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाकडून केली जात आहे.

## गजकेसरी स्टील कारखान्यात स्फोट; वीस कामगार जखमी, तीन गंभीर



जालना- येथील औद्योगिक वसाहत परिसरात असलेल्या लोखंडी सळ्याचे उत्पादन करणाऱ्या “गजकेसरी स्टील “या कारखान्यामध्ये आज शनिवार दिनांक 24 रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास मोठा स्फोट झाला .कारखान्यात झालेल्या या स्फोटामुळे प्रचंड आवाज झाला आणि आजूबाजूला धुळीमुळे अंधारही पसरला .या अपघातामध्ये 20 कामगार जखमी झाले आहेत आणि तीन कामगार गंभीर जखमी झाले आहेत अशी प्राथमिक माहिती बाहेर आली आहे. जखमी कामगारांना शहरातीलच एका खाजगी रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. या संदर्भात कारखाना व्यवस्थापनाकडून अद्याप पर्यंत अधिकृत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान या अपघाताची पाहणी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी केली आहे.

## शेतकऱ्यांनी पीक नुकसानीच्या तक्रारी क्रॉप इन्शुरन्स ॲपवर ऑनलाईन कराव्यात - धनंजय गुंदेकर

बीड (प्रतिनिधी) आज सकाळपासून शेतकऱ्यांचे फोन येण्यास सुरुवात झालेली आहे. बऱ्याच ठिकाणी खूप पाऊस पडल्याचे व शेतात पाणी साचून पिकाचे नुकसान होत असल्याचे सांगण्यात येत आहे.. ज्या ज्या मंडळात काल अन् रात्री भरपूर पाऊस पडलेला आहे तेथील शेतकऱ्यांनी सोयाबीन, मूग, उडीद, बाजरी या पिकांची पीकविमा नुकसान ऑनलाईन तक्रार (क्लेम) करावी.. जे जे ऑनलाईन क्लेम करतील त्याच शेतकऱ्यांना नुकसानीची मदत मिळणार आहे.. वर्षभरात एकच तक्रार ग्राह्य धरली जाणार असून ती कोणत्याही स्टेज मध्ये केलेली असली तरी पीक कापणी प्रयोगाच्या आधारेच मदत मिळणार आहे.. एकाच वेळी सर्व तक्रारी आल्या तर २५% अग्रिम देखील मंजुरी मिळू शकते व तदनंतर उर्वरित नुकसानीच्या प्रमाणात मदत मिळणार आहे.. तक्रार करताना शेतकऱ्यांनी inundation व access of rainfall या type of incidence ला प्राधान्य द्यावे.. यात अजून काही माहिती आवश्यक असल्यास माझ्या 9689043949 या क्रमांकावर संपर्क करावा...




# पाटोदा नगरपंचायतच्या ढसाळ कारभारामुळे माऊली नगर वासियांना ना रस्ता,ना पाणी,ना लाईट विना खावा लागत्यात खस्ता - दादा जावळे

**पाटोदा (प्रतिनिधी)**

पाटोदा नगरपंचायत वार्ड एक मधील माऊली नगर मध्ये रस्ता नसल्यामुळे सर्वत्र चिखल मय परिसर झाल्याने येथील नागरीकांना चालणे फिरणे फार अवघड झालेले असून या भागात घाणीचे साम्राज्य वाढल्याने डेंगू चिकन गुनियाचे घराघरात रुग्ण सापडत आहे तसेच भर पावसाळ्यात नळाद्वारे आठ आठ दिवस झाले तरी पाणी येईना तर माऊली नगर मधील काही भागात विद्युत पोलवर विद्युत दिवे नाहीत या मुळे सर्वत्र अंधारच अंधार आसुन भारत स्वातंत्र्य होऊन 75 वर्षे होऊन गेली तरी पण माऊली नगर वासियांना ना रस्ता,ना पाणी,ना लाईट,विना पाटोदा नगरपंचायतच्या ढसाळ नियोजना मुळे खावा लागत्यात खस्ता अशी टिका युवानेते दादा जावळे यांनी केली आसुन पाटोदा नगरपंचायतने लवकरात लवकर उपाय योजना कराव्यात नसता पाटोदा नगरपंचायतच्या दारात लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे युवा नेते दादा जावळे यांनी दिला आहे



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077